# शिक्षण विभाग


**पत्ता** :- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला,


टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर.

**फोन नंबर** :- 0240-2333536-40 शिक्षण विभाग : 221, 222

Email:- amceducationdep@gmail.com


Google Location :
https://www.google.com/maps/place/19%C2%B053'25.5%22N+75%C2%B019'27.6%22E/@19.8904021,75.3217636,17z/data=!3m1!4b1!4m4!3m3!8m2!3d19.8904021!4d75.3243385?hl=en&entry=ttu&g_ep=EgoyMDI1MDQwMi4xIKXMDSoJLDEwMjExNDU1SAFQAw%3D%3D

**Latitude**:19.890402 **Longitude**:75.324339





## ➤ प्रस्तावना :

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत एकूण 107 बालीवाडीचे वर्ग असून 53 प्राथमिक शाळा व 17 माध्यमिक शाळा आहेत. यापैकी 6 शाळेत CBSE पॅटर्न चे वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या सर्व शाळेत 17730 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

- बालवाडी विद्यार्थी संख्या : 3699
- इ.1ली ते 5वी विद्यार्थी संख्या : 8514
- इ.6वी ते 8वी विद्यार्थी संख्या : 3718
- इ.9वी ते 10वी विद्यार्थी संख्या : 1799
- एकूण कार्यरत मुख्याध्यापक : 19
- एकूण शिक्षक संख्या(प्राथमिक) : 396
- एकूण शिक्षक संख्या(माध्यमिक) : 54
- एकूण बालवाडी शिक्षिका : 107

महानगरपालिकेच्या सर्व शाळा स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत स्मार्ट केल्या आहेत. मा. जी श्रीकांत, आयुक्त तथा प्रशासक महोद्य यांच्या संकल्पनेतून "Smart School to Best School" हा प्रकल्प राबविला जात आहे, या प्रकल्प अंतर्गत विद्यार्थ्यांची उपस्थिती ० ा गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी व शिक्षकांचे अशैक्षणिक कामकाजाची वेळ कमी होण्यासाठी "Smart Guru" या ॲपची निर्मिती केली असून, नाविन्यपूर्ण सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम ची स्थापना केली आहे. विविध नाविन्यपुर्ण उपक्रमामुळे महानगरपालिकेच्या शाळेची पटसंख्या वाढली असुन उपस्थिती 69% वरुण 84% गेली आहे.व विदयार्थ्यांची गुणवत्ता 5% वाढली आहे.




# ➢ अधिकारी व कर्मचारी यांची माहिती :-

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी नाव | पद | मोबाईल नंबर | Email Id | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. भारत तीनगोटे | शिक्षणाधिकारी (प्रभारी) | 8275238736 | bharattingote97 @ gamil.com | विभागाचे दैनंदिन कामाचे व्यवस्थापन, संचिका मंजुर करुन वरिष्ठाकडे पाठविणे.सर्व कामावर देखरेख ठेवणे |
| 2 | श्री ज्ञानदेव सांगळे | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | 8275004458 | sangledb@ com. | समग्र शिक्षा अभियान विभाग, शिक्षण विभातर्गंत विविध नाविन्यपुर्ण प्रकल्पाचे/ कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजाबणी. SMART SCHOOL TO BEST SCHOOL प्रकल्प, सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम, गुणवत्तेची पंचसुत्री कार्यक्रम इ. |
| 3 | श्री रामनाथ थोरे | शिक्षण विस्तार अधिकारी | 9422212578 | rthore10@ gamil.com | शहर साधन केंद 1 अर्तगत सर्व मनपा व खाजगी शाळेची तपासणी, RTE 25% प्रवेश प्रक्रिया, नवभारत साक्षरता, बालविवाह प्रतिबंध |
| 4 | श्री. गोविंद बाराबोटे | कार्यालयीन अधिक्षक | 7588819736 | govindvbarabote @gmail.com | प्रशासकिय कामकाजाचे सनियंत्रन करणे कार्यालयीन कर्मचारी याच्याकडून काम करून घेणे.न्यायालयीन प्रकरण हाताळणे, शिक्षक व शिक्षकेत्तर चौकशी प्रकरणे हाताळणे, टपाल पाहणी. |
| 6 | श्री. नाना भिसे | वरिष्ठ लिपीक | 7588535729 | nanabhishe70@ gamil.com | अर्जित व वैदयकिय रजा, विदेश परवानगी, आस्थापना (शिक्षण विभाग,) वेतन निश्चिती, संच मान्यता, बिदुंनामावली चटोपाध्याय नुसार वरिष्ठ वेतन श्रेणी, वार्षिक वेतन वाढ, आंतर जिल्हा बदली प्रकरणे हाताळणे, नविन सह शिक्षक भरती विषयक कामे. |

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी नाव | पद | मोबाईल नंबर | Email Id | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| 7 | श्री. राजेश गावित | वरिष्ठ लिपीक | 9960839082 | rajeshgavit7778 @ gamil.com | सेवानिवृत्ती वेतन,जात पडताळणी,तक्रार /चौकशी प्रकरणे हाताळणे पारपात्र /ना हरकत प्रमाणपत्र अभ्यासक्रम परवानगी, सर्व शिक्षक व कर्मचारी यांच्या रजेचा तपशिल ठेवणे, माहितीचा अधिकार अधिनियम-2005. |
| 8 | श्रीमती जिजाबाई निकम | वरिष्ठ लिपीक | 9823721085 | jijabainikam123 @ gamil.com | बालवाडी व शिक्षकांचे वेतन तसेच शिक्षकेत्तर यांचे वेतन अदा करणे, अनुदान निर्धारण, लेखापरीक्षण संबधित प्रकरणे, गोपनिय अहवाल, चतुर्थ श्रेणी कर्मचारी नियुक्ती व बदली प्रकरणे, बालवाडी शिक्षिका मुदतवाढ. |
| 9 | श्रीमती परविन बानो | कनिष्ठ लिपिक | 9923305764 | | भविष्य निर्वाह निधी, शालेय इमारत भाडे, शाळांचे विद्युत बिल अदा करणे, राजपत्रानुसार नावात बदल प्रकरणे, टी.सी. प्रकरणे. |
| 10 | श्रीमती शेख शबाना | कनिष्ठ लिपिक | 9175737820 | shabanasheikh7 3@ gamil.com | भांडार / शैक्षणिक सहलीस परवानगी, सी आर फार्म, कंत्राटी शिक्षक हजेरी. |

# ➢ वैशिष्ट्यपुर्ण कामे:

## ✓ CBSE पॅटर्न व सेमी इंग्रजी :

महानगरपालिकेच्या शाळेत पूर्वी फक्त मराठी व उर्दु माध्यम मधून शिक्षण दिले जात होते. आता यासोबत 6 शाळेत CBSE पॅटर्न मधून तर सर्व शाळेत सेमी इंग्रजी मधून शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण महानगरपालिकेच्या शाळेत मिळू लागले तसेच सेमी इंग्रजी मुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी हा विषय सुधारण्यास मदत झाली व याचा फायदा उच्च शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना होणार आहे.

## ✓ SMART GURU App:-

महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती कमी होती म्हणून मा. आयुक्त तथा प्रशासक महोद्य यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांची हजेरी ऑनलाईन करण्यासाठी व शिक्षकांचा अशैक्षणिक कामाचा वेळ वाचवून तो वेळ अध्ययन-अध्यापनासाठी देता यावा, याकरिता SMART GURU App ची निर्मिती केली. या ॲप चे लॉगीन प्रशासकीय यंत्रणेपासून शाळास्तरावर मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

## ✓ सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम :-

महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी नाविन्यपूर्ण सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम ची स्थापना करण्यात आली. गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रथमत: विद्यार्थी शाळेत दैनंदिन उपस्थ्ति असणे आवश्यक आहे. त्याकरिता "SMART GURU App" च्या माध्यमातून विद्यार्थ्यांची उपस्थिती व सतत 3 दिवस, 7 दिवस व 15 दिवस अनुपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संपर्क साधून शिक्षणाचे महत्व बाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांना दैनंदिन उपस्थित ठेवण्यासाठी या कंट्रोल रुम मध्ये 5 समुपदेशक (Counselor) ची नियुक्ती करण्यात आली आहे. या नाविन्यपूर्ण कंट्रोल रुम मुळे विद्यार्थ्यांची 69-73% वरुन 79-81% पर्यंत पोहोचली आहे तसेच गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रमाचे नियोजन या कंट्रोल रुम च्या माध्यमातून केले जाते. त्यामुळे गुणवत्ता 5% ने वाढ झालेली दिसून येते. तसेच महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढत आहे.

## ✓ Synthetic Turf :-

मा. आयुक्त तथा प्रशासक महोद्य यांच्या संकल्पनेतून **“आम्हाला खेळू द्या”** या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या शाळेत **“सिंथेटिक टर्फ”** ची उभारणी करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवू लागले आहे. तसेच विद्यार्थी विविध खेळात तालुका, जिल्हा, विभाग स्तर पर्यंत सहभागी झाले आहेत. **“खेळता खेळता शिका”** या उक्ती मधून विद्यार्थी आनंदाने शिक्षण घेऊ लागले आहेत. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे.

## ✓ रोबोटिक्स मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधत्व :-

महानगरपालिकेच्या केंद्रिय प्राथमिक शाळा नारेगांव, के प्रा शा इंदिरानगर बायजीपुरा आणि के प्रा शा किराडपुरा नं.1 या शाळेमध्ये पुणे येथील रोबोटिक्स इंडिया लि., या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोबोटिक्स बाबत माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन घेतले जाते. या शाळेतील विद्यार्थ्यांनी पुणे येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेमध्ये रोबोटिक्स मधील लाईन फ्लोअर या उपक्रमात प्रथम क्रमांक मिळविला व या विद्यार्थ्यांना युरोप खंडातील एस्टोनिया या देशामध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये भारत देशाचे प्रतिनिधत्व करण्याची संधी मिळाली.

## ➢ प्रकल्पाचे फोटो व माहिती:-

## ➢ VISION:-

मा. आयुक्त तथा प्रशासक महोद्य यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर शहराला मराठवाड्याचे **“शैक्षणिक केंद्र”** (Education Hub) म्हणून ओळख निर्माण करणे.

शहरातील महानगरपालिकेच्या शाळा **“गुणवत्तापूर्ण व सर्वांगिण शिक्षण ”** देणाऱ्या शाळा म्हणून लौकीक मिळविणे.






“ *Smart School To Best School* ”

# निर्णय...

➢ **महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या, उपस्थिती व गुणवत्ता वाढविण्यासाठी घेतलेले निर्णय.**

- ✓ सेमी इंग्लिश माध्यम
- ✓ स्मार्ट स्कुल
- ✓ स्मार्ट गुरु ॲप
- ✓ सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम
- ✓ समुपदेशक, संगीत व क्रीडा निदेशक नियुक्ती
- ✓ कन्टेनर लायब्ररी
- ✓ आम्हाला खेळु द्या-सिन्थेटिक टर्फ
- ✓ समर कॅम्प
- ✓ स्मार्ट किऑक्स संच (SMART KIOSK) बालवर्गासाठी

“ *Smart School To Best School* ”

# शाळा पूर्व तयारी कार्यशाळा…

- दिनांक 30.05.2023
- मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी प्रथमत: सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, बालताई, माध्यमिक शिक्षक, सेवक यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांची **एकत्रित कार्यशाळा** घेऊन सर्वांसोबत **संवाद** साधला.






LOKMAT TIMES

## Good response to CSMC semi-English schools

2,500 new students would be admitted this year

LOKMAT NEWS NETWORK
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

The semi-English schools run by Chhatrapati Sambhajinagar Municipal Corporation (CSMC) are getting a good response for admissions.

There is a craze among parents to admit their wards in English schools. The number of English schools has increased during the last few years due to this. The private Englishs charge heavy fees.

Considering this, the CSMC started semi-English schools last year. Around 2,000 students took admissions to the standard 1 last year. These students were promoted to second standard this year. The sources from the education department of the CSMC said that 2,500 new students would be admitted this year.

The Corporation also started six CBSE schools three years ago. They are also getting a good response. The CSMC runs more than 65 schools in the different parts of the city.

Over 18,000 students are studying in the schools. The schools which are located in Naregaon, Kiradpura, Baijipura, Padegaon, Harsul and Garkheda areas have a high number of students strength.

Earlier, only children of poor parents were studying in the CSMC schools. Now, the trend is changing. Taking into consideration the huge fees in private schools, many parents prefer the CSMC schools. More than 50 Municipal schools have been made Smart Schools.

The Smart City administration spent Rs 65 crore on this. Not just schools have become smart, but students are also being educated digitally.

Administrator G Sreekanth decided to start 50 semi-English schools last year. Students were admitted to Standard I for semi-English in June last year.

Almost 2,000 students enrolled for semi-English in Class I. Similarly, CBSE schools are also receiving good responses every year. CBSE schools will have classes up to standard fifth only.

**What is semi-English?**

In semi-English, students from first to fourth standards have English along with Mathematics in English medium. Science subject is also taught in English from standard V. A total of 50 CSMC schools have semi-English medium in the city.

**Free textbooks**

Under Samagra Shiksha Abhiyan of the Central and State governments, free textbooks are provided to students from first to eighth standard in government, aided and Municipal Corporation schools. This year, the civic body has given an order of separate books of semi-English for the students.



जून महिन्यापासूनच अंमलबजावणीची घोषणा

## मनपाच्या सर्व शाळा आता सेमी इंग्लिश

कोण काय म्हणाले

“ Smart School To Best School ”

# शाळा भेट...

- मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय यांना शाळा भेटी मधून विद्यार्थी **अनियमित उपस्थित** असल्याचे निदर्शनास आले.
- त्यामुळे विद्यार्थी गुणवत्ता वाढ होत नाही.
- प्रथमतः विद्यार्थी नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे. यासाठी **“स्मार्ट गुरु ॲप”** व **“सावित्री एज्युकेशन कंट्रोल”** रुम ची स्थापना करणेबाबत संकल्पना.







“ *Smart School To Best School* ”

# SMART GURU APP..

➤ **SMART GURU APP मुळे शाळेपासून दुर गेलेले अनेक विद्यार्थ्यांचा शोध लागला.**






## वाह गुरू! शाळा बुडविणाऱ्या विद्यार्थ्याला सहज शोधले

### शिक्षकांनी थेट घरी जात पटवून दिले शिक्षणाचे महत्त्व : पुन्हा सुट्टी न मारण्याची वदवून घेतली शपथ

राहुल जांभळे

छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा : घरातून शाळेसाठी निघणाऱ्या परंतु सतत शाळेत गैरहजर राहणाऱ्या एका विद्यार्थ्याला महापालिकेच्या स्मार्ट गुरू ॲपने सहज शोधले. मग काय या विद्यार्थ्याची त्याच्या मित्रांकडून माहिती घेत शिक्षकांनी थेट त्याचे घर गाठले. त्यांनी या विद्यार्थ्याला विश्वासात घेत समुपदेशनाने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यामुळे तो लगेच शाळेत जाण्यासाठी तयार झाला आणि यापुढे कधीही शाळा बुडवणार नाही, असे आश्वासन त्याने शिक्षकांना दिले.

सतत गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्याच्या घरी जाऊन मनपा शाळेतील शिक्षकांनी त्याला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

#### घरी जाऊन समुपदेशन

स्मार्ट गुरू ॲपमुळे सतत गैरहजर असणारे विद्यार्थी ट्रॅक होत आहेत. त्यांना शाळेतून व एज्युकेशन कंट्रोल रूममधून कॉल केले जात आहेत. पंधरा दिवस गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या अडचणी लक्षात घेत त्यांचे समुपदेशन करून त्यांना शाळेत आणले जाते.

#### दिव्यांग मित्र ही संकल्पना

पालिकेच्या शाळेत ३३६ विद्यार्थी दिव्यांग आहेत. त्यांच्यासाठी प्रत्येक वर्गात दिव्यांग मित्र ही संकल्पना सुरू केली आहे. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांनासुद्धा आपल्या सोबत मित्र खेळतो म्हणून शाळेची आवड लागली आहे. त्यातील जे विद्यार्थी शाळेत येऊ शकतात, असे विद्यार्थी शाळेत येऊ लागले आहेत.

#### ॲपमुळे वाढली विद्यार्थ्यांची हजेरी

या ॲपमुळे पालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती संख्या वाढली आहे. ॲपपूर्वी पालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती सरासरी ७० ते ७४ टक्के होती, आता मात्र, विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती ७९ ते ८३ टक्के झाली आहे.





“ *Smart School To Best School* ”

# सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम...

- जे विद्यार्थी अनिमित शाळेत येतात अशा विद्यार्थ्यांना नियमित उपस्थित ठेवण्यासाठी पालक आणि प्रशासनाचा संवाद झाला पाहिजे म्हणून सावित्री एज्युकेशन रुमची स्थापना करण्यात आली.
- तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोद्य यांच्या हस्ते महानगरपालिकेच्या विकास कामामध्ये सावित्री एज्केशन कंट्रोल रुमचा उद्घाटन करण्यात आले आहे.





शिक्षण विभागावर नजर

'सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम'मुळे विद्यार्थी उपस्थितीत २५ टक्के वाढ



# सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम चे यश...

- मा.उप मुख्यमंत्री महोद्‌य यांच्या अव्हानाला प्रतिसाद देत सावित्री ने ‘लेकी’ ला आणले पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात!
- सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुमच्या माध्यमातून 1369 विद्यार्थी झाले नियमित.







• मनपा के स्मार्ट गुरु एप के चलते पुनः शिक्षा की धारा में हुई शामिल

## उपमुख्यमंत्री पवार का कॉल, 30 दिनों बाद छात्रा पहुंची स्कूल

### ये अधिकारी पहुंचे घर

### मां जाती है बर्तन धोने, बहन बीमार



गरिबीमुळे शाळा सोडून करीत होती दुकानात काम | उपमुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पुन्हा शाळेत

## ‘सावित्री’ने ‘लेकी’ला आणले पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात!

▸ सकाळ वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, ता. ६ : घरची परिस्थिती हलाखीची. त्यात वडिलांचे छत्र हरवले. आईवर येणारा आर्थिक ताण कमी करण्यासाठी १० वीच्या विद्यार्थिनीने शाळा सोडण्याचा निर्णय घेत एका दुकानात काम सुरू केले. महापालिकेच्या ‘गुरू ॲप’मध्ये या विद्यार्थिनीची अनुपस्थिती आढळून आली. सोबतच गैरहजर विद्यार्थ्यांना कॉल करण्यासाठी व त्यांनी पुन्हा शाळेत आणण्यासाठी सुरू केलेल्या ‘सावित्री एज्युकेशन कंट्रोल रूम’ने तत्काळ सकारात्मक कार्यवाही केली. यातून या लेकीला पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात यश आले.**

छत्रपती संभाजीनगर : महापालिका शाळेत शिक्षणासाठी पुन्हा दाखल झालेल्या भारतीला पुस्तके देताना जी. श्रीकांत. सोबत नंदा गायकवाड, ज्ञानदेव सांगळे आदी.

### मुख्याध्यापकांनी उचलला शिक्षणाचा खर्च

शाळेत येताच तिने प्रशासकांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. तिला बोलावून घेत जी. श्रीकांत यांनी चर्चा केली व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. तिला कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. या विद्यार्थिनीच्या बारावीपर्यंतच्या शिक्षणाचा खर्च मुख्याध्यापक अहमद पटेल यांनी उचलला.

*“ Smart School To Best School ”*

# सावित्री ला विविध पदाधिकारी व अधिकारी यांची भेट...

- सावित्री एज्युकेशन कंट्रोल या नाविन्यपूर्ण रुमला अनेक **पदाधिकारी** व **अधिकारी** यांची भेट.





**राज्याचे सचिव डॉ. निपुण विनायक यांची सावित्री कंट्रोल रुमला भेट**

छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी)– महापालिकेचे तत्कालीन आयुक्त व राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांनी आज बुधवारी सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुमला भेट देऊन पाहणी केली. मनपा प्रशासक तथा आयुक्त जी. श्रीकांत यांनी या उपक्रमाची माहिती डॉ. निपुण विनायक यांना दिली.

मनपाचे प्रशासक जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून मनपाच्या शाळेत स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती व गुणवत्ता वाढविण्यासाठी स्मार्ट गुरू अ‍ॅपची निर्मिती आणि सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुमची स्थापना करण्यात आलेली आहे. या सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुममध्ये

समुपदेशकाची नियुक्ती करण्यात आली आहे. समुपदेशक व मनपा शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या मा
१३६९ मुलांना शाळे
प्रवाहात आणण्यात
नावीन्यपूर्ण कंट्रो
महाराष्ट्रातून तसेच
विविध शैक्षणिक
प्रतिनिधी व वरिष्ठ
तसेच लोकप्रतिनिध
आहेत. नुकतेच
तत्कालीन आयु
राज्याच्या आरोग्य
कल्याण विभागाचे
निपुण विनायक
सावित्री एज्युकेशन
रुमला भेट देऊन
माहिती घेतली.
मनपा प्रशासक जी.
उपायुक्त तथा
विभागप्रमुख नंदा ग
नियंत्रण अधिका
दांडगे, शिक्षणाधिक
तीनगोटे व सर्व स
उपस्थित होते.

**सावित्री एज्युकेशन कंट्रोल रूमची शिक्षण सचिवांनी केली पाहणी**

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर



मनपाने सुरू केलेल्या सावित्री एज्युकेशन कंट्रोल रूमची राज्याचे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी बुधवारी पाहणी केली. या वेळी मनपा शाळेतील विद्यार्थी,

...तवारी ठरते. या ...त विद्यार्थ्यांची







**پرنسپل سکریٹری رنجیت سنگھ نے کیا ایجوکیشن کنٹرول روم کا معائنہ**

مہاراشٹر کے تمام اسکولوں میں یہی سسٹم روبہ عمل لانے کا کیا عزم



“ *Smart School To Best School* ”

# सावित्री ला मिळालेले पुरस्कार...

- सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुमला “**स्कॉच**” पुरस्कार मिळाला .
- स्मार्ट गुरु - सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुमला हैद्राबाद येथे “**गव्हर्नर्स नाऊ**” पुरस्कार मिळाला.











छत्रपती संभाजीनगर : पुरस्कार स्वीकारताना जी. श्रीकांत, अपर्णा थेटे, अंकुश पांढरे, फैज अली आदी.

## ‘उडान, सावित्री कंट्रोल रूमला पुरस्कार

**छत्रपती संभाजीनगर, ता. २४ :** छत्रपती संभाजीनगर महापालिका आणि औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला गव्हर्नन्स नाऊ या संस्थेकडून डिजिटल ॲड्रेस नंबर प्लेट (उडान) आणि स्मार्ट गुरू – सावित्री कंट्रोल रूम या दोन प्रकल्पांसाठी बुधवारी (ता. २४) तीन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महापालिकेने शाळेपासून दूर गेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सावित्री कंट्रोल रूम तयार केली आहे. त्यामार्फत हजारो विद्यार्थी पुन्हा शाळेत परतले आहेत. त्याची दखल घेत स्मार्ट व्यवस्थापनासाठी ‘स्मार्ट गव्हर्नन्स’ या घटकांत गव्हर्नन्स नाऊ पुरस्कार देण्यात आला. सोबतच स्मार्ट सिटीला आयटी प्रोजेक्ट मॅनेजमेंट एक्सलन्स व आयटी इनोव्हेशन अशा दोन घटकांत युनिक डिजिटल ॲड्रेस नंबर (उडान) प्रकल्पाला पुरस्कार जाहीर झाला. जी. श्रीकांत यांनी बुधवारी पुरस्कार स्वीकारले. यावेळी उपायुक्त अपर्णा थेटे, अंकुश पांढरे, स्मार्ट सिटी प्रकल्प समन्वयक गणेश दांडगे, फैज अली, पीएमसीचे प्रसाद पाटील व सुजाता दिवाकर उपस्थित होते.

# सावित्री ची देशपातळीवर चर्चा...

- केंद्र शासनाने दिल्ली येथे आयोजित केलेल्या स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत देशातील निवडक चांगले काम केलेल्या 20 शहरांचे प्रदर्शनामध्ये सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुम ची चर्चा सर्वत्र झाली व देशातील व बाहेर देशातील अधिकारी यांनी प्रदर्शन ठिकाणी भेट देऊन सावित्री एज्युकेशन बाबतची माहिती जाणून घेतली





'सावित्री' एजुकेशन ने नई दिल्ली में छोड़ी छाप




स्मार्ट सिटी एक्सपो में शिवसृष्टि व जियोलॉजिकल पार्क का आकर्षण

देश की राजधानी दिल्ली में की जा रही शहर की ब्रॉडिंग

शहर को मिल रही प्रसिद्धि


शहरातील 'सावित्री'चा दिल्लीत डंका!

पर्यटक, तज्ज्ञांकडून कौतुक : स्मार्ट सिटी अभियानांतर्गत सादरीकरण



“ *Smart School To Best School* ”

# संगीत व क्रीडा निदेशक नियुक्ती...

- ➤ **शाळेत विद्यार्थी हसत खेळत शिक्षण घेण्यासाठी व टिकवून राहण्यासाठी मनपा च्या शाळेत संगीत व क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली.**





## महापालिका शाळेत मिळणार संगीताचे धडे

### ‘स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल’ उपक्रम, नऊ शिक्षकांची केली नियुक्ती

■ सकाळ वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, ता. ६ : महापालिका शाळेतील संगीतप्रेमी विद्यार्थ्यांना संगीताचे धडे मिळणार आहेत. त्यासाठी प्रशासनाने नऊ संगीत शिक्षकांची नियुक्ती केली. त्यासोबतच शारीरिक शिक्षकांनाही नियुक्तिपत्र देण्यात आले आहे.

महापालिकेचे प्रशासक जी. श्रीकांत यांनी शिक्षण विभागाकडे विशेष लक्ष दिले असून, त्यांच्या संकल्पनेतून ‘स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल’ हा

छत्रपती संभाजीनगर : संगीत शिक्षकांना मंगळवारी नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी जी. श्रीकांत यांच्यासह सौरभ जोशी, नंदा गायकवाड व अधिकारी.

विविध उपक्रम राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी स्मार्ट गुरू ॲप व सावित्री एज्युकेशन कंट्रोलरूम तयार करण्यात आले

चार समुपदेशक विद्यार्थ्यांची हजेरी वाढविण्याचे काम करत आहेत. त्यासोबतच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी अकरा शारीरिक

नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नुकतेच नियुक्तिपत्र देण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी उपायुक्त तथा शिक्षण विभागप्रमुख नंदा गायकवाड, नियंत्रण अधिकारी गणेश दांडगे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे व विशाल खरात आदी उपस्थित होते. या शिक्षकांसोबत प्रशासक जी. श्रीकांत यांनी संवाद साधला. महापालिका शाळेत शिकणारा विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करताना दिसावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



## आता जिल्हास्तरीय स्पर्धा खेळल्यास ५ तर, विभागीय स्पर्धा खेळल्यास १० क्रीडा गुण

**यंदापासून मिळणार लाभ** : २० डिसेंबरच्या निर्णयात शासनाने बदल केल्याने खेळाडूंना दिलासा





# आनंददायी शिक्षण...

➤ संगीत शिक्षक / शिक्षणामुळे विद्यार्थी आनंददायी शिक्षण शाळेत घेत असून, यामुळे विद्यार्थ्यांना **नियमित** शाळेत येण्याची **गोडी** लागली आहे.






*“ Smart School To Best School ”*

# Container Library स्थापना...

- महानगरपालिकेच्या 30 शाळेत एकूण 36 अद्यावत Container Library ची स्थापना करण्यात आली.
- यामुळे प्रत्येक शाळेत कॉम्प्युटर रुम व सुजज्ज ग्रंथालय उपलब्ध झाले आहे.







“ *Smart School To Best School* ”

# सिंथेटिक टर्फ ची स्थापना…

➢ महानगरपालिकेच्या 11 शाळेत “आम्हाला खेळू द्या” या उपक्रमांतर्गत सिंथेटिक / क्रिकेट टर्फ ची स्थापना करण्यात येत आहे.








पुण्यनगरी

## उदयोन्मुख खेळाडू घडविण्याचा मनपाचा संकल्प

मनपाच्या प्रियदर्शनी शाळेत टर्फ ग्राउंडचे लोकार्पण : उस्मानपुरा शाळेत विविध खेळांचे भूमिपूजन



...जीनगर. लोकमत

## महापालिका शाळांमध्ये क्रिकेट टर्फ

### चांगले खेळाडू घडविणार : प्रायोगिक तत्त्वावर काही शाळांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : क्रिकेटचा विश्वचषक यंदा भारतात होत आहे. त्यामुळे सर्वत्र 'क्रिकेटज्वर' दिसून येत असताना महापालिका प्रशासनाने शाळांमध्ये सिंथेटिक टर्फ तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील काही महापालिका शाळांची यासाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनाही क्रिकेट खेळण्याचा आनंद घेता यावा, चांगले खेळाडू तयार व्हावेत, हा त्यामागील प्रशासनाचा उद्देश आहे.

शहरात महापालिकेच्या एकूण ७० शाळा आहेत. त्यामध्ये १७ माध्यमिक शाळांचा समावेश असून, १८ हजार ४४८ विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेतात. पूर्वी ही संख्या जवळपास २५ हजार होती. विद्यार्थ्यांची गळती हा सर्वात मोठा चिंतेचा विषय प्रशासनासमोर होता. प्रशासक जी. श्रीकांत यांनी गळती थांबविण्यासाठी २७ लाख रुपये खर्च करून गुरू ॲप तयार केले. याचे चांगले परिणामही दिसू लागले. ५० शाळा स्मार्ट करण्यात आल्या. आता मनपा शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांच्या रांगा लागत आहेत. शिक्षणाचा दर्जा सर्वोत्तम असावा, सोयी-सुविधाही दर्जेदार असाव्यात, यावर सध्या भर दिला जात आहे. गारखेड्यातील प्रियदर्शनी विद्यालय, किराडपुरा, नारेगाव आदी ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी सिंथेटिक टर्फ तयार करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना क्रिकेटचे धडे गिरवता आले पाहिजेत. मनपा शाळांमधील विद्यार्थीही क्रिकेटच्या क्षेत्रात पुढे यावेत, अशी प्रशासनाची अपेक्षा आहे.

महापालिकेच्या काही शाळांमध्ये अशा पद्धतीने क्रिकेट टर्फ तयार केले जाणार आहे.

“ *Smart School To Best School* ”

# विविध स्तरावर क्रीडा मध्ये यश...

- “आम्हाला खेळू द्या” या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक उपलब्ध झाल्यामुळे महानगरपालिकेचे विद्यार्थी जिल्हा / विभाग / राज्य स्तरावर आयोजित झालेल्या क्रीडा स्पर्धेत मध्ये यशस्वी झाले.










# रोबोटिक्स आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधत्व...

- महानगरपालिका नारेगांव आणि इंदिरानगर बायजीपुरा शाळेतील भारत देशाचे **रोबोटिक्स** मध्ये युरोप इस्टोनिया या देशामध्ये प्रतिनिधत्व करत आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे.





## महापालिका शाळेची मुले हुशार!

रोबोटिक्स चॅम्पियनशिपमध्ये बाजी, नारेगाव शाळेचे विद्यार्थी प्रथम

नारेगाव, ता. १२ : पुणे येथे शनिवार (ता. दहा) व रविवारी (ता. ११) घेण्यात आलेल्या 'रोबोटिक्स इंडिया' स्पर्धेत महापालिकेच्या नारेगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

पुण्यातील एमआयटी कॉलेज काळभोर येथे ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेत केंद्रीय प्राथमिक शाळा किराडपुरा नंबर-१, केंद्रीय प्राथमिक शाळा नारेगाव व इंदिरानगर बाजीपुरा

नारेगाव : रोबोटिक्स चॅम्पियनशिपमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांसोबत अंकुश पांढरे व





## 'From Naregaon to Europe'

Dreams take flight as municipal school students head to Europe

It is a matter of pride for the city, four students from the municipal corporation schools will participate in the Robotex International 2024, to be held in Estonia (Europe) between December 6 and 7.

...

In addition to the four students from the municipal corporation schools, three students from Zilla Parishad schools will take part in the competition.

The CSMC education officer Bharat Tingote, head-

...

Result of ambitious initiative

...

Adv Khaled

MIT cel





# चंद्रयान...

➤ महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना लाईव्ह चंद्रयान-3 चे प्रक्षपण पाहण्यासाठी स्मार्ट सिटी कार्यालयात व्यवस्था करण्यात आली होती.

## विद्यार्थ्यांनी केली चांद्रयानाची प्रतिकृती

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

बन्सीलालनगर येथील महापालिकेच्या केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांद्रयान, ज्वालामुखी, दुर्बिणीच्या प्रतिकृती तयार केल्या. प्रशासक जी. श्रीकांत यांनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि मार्गदर्शनही केले.

बन्सीलालनगर यथेली शाळेत विविध विकास कामांसह संगणक लॅब, कंटेनर लॅबचे उद्घाटन जी. श्रीकांत यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन देखील प्रशासकांनी केले. प्रदर्शनात १०५ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी चंद्रयान, ज्वालामुखी, दुर्बीण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नो सिंगल युज प्लास्टिक या बद्दलच्या प्रतिकृती तयार केल्या. कागदाने व मातीचा वापर करुन तयार केलेल्या वस्तूही प्रदर्शनात ठेवण्यात आल्या होत्या. या सर्व वस्तु पाहून प्रशासकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना मार्गदर्शन देखील केले. विद्यार्थ्यांनी प्रशासकांच्यासमोर काही उताऱ्यांचे वाचन केले, काही कविता देखील म्हणून दाखवल्या. आदिती कुमावत या विद्यार्थिनीने इंग्रजीतून भाषण केले व आयएएस होण्याची इच्छा व्यक्त केली. तिची जिद्द आणि तयारी पाहून प्रशासकांनी त्यांना मसुरी येथे प्रशिक्षणात मिळालेली पाण्याची बाटली तिला बक्षीस म्हणून दिली.

या वेळी उपायुक्त अंकुश पांढरे, संनियंत्रण अधिकारी गणेश दांडगे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे, बांधकाम व्यावसायिक संग्राम पठारे यांची विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्याध्यापक आसाराम जाधव यांनी केले. सूत्रसंचालन विद्या पंचपोर यांनी केले कर शरद कापुरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नंदा गटकळ, वैशाली चव्हाण, पद्मावती बाविस्कर, मनीषा काळे, रेखा माचेवार, शरद कापुरे, गणेश शिरसाट, रोहिदास काकडे, उमेश गायकवाड, युवराज काकडे आदींनी परिश्रम घेतले.



विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंची पाहणी जी. श्रीकांत यांनी केली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले.

## चंद्रयान 3 को सफर पर जाते देख झूमे मनपा स्कूल के बच्चे

▪ स्मार्ट सिटी कार्यालय में किया गया ऐतिहासिक सीधा प्रसारण

शहर संवाददाता | छत्रपति संभाजीनगर

भारतीय अंतराल संशोधन संस्था (इसरो) की ओर से चंद्रयान 3 ने शुक्रवार, 14 जुलाई को श्रीहरिकोटा से उड़ान भरी। इस मुहिम की जानकारी मनपा विद्यार्थियों को देने के लिए स्मार्ट सिटी डेवलपमेंट कार्पोरेशन की ओर से कॉन्फ्रेंस हॉल में सीधे प्रसारण का आयोजन किया गया। मनपा स्कूल के 100 विद्यार्थी चंद्रयान 3 को चंद्रमा के सफर पर जाते देख झूम उठे।

**ऐसे किया गया आयोजन :** मनपा स्कूल के विद्यार्थियों में विज्ञान के संबंध में दिलचस्पी निर्माण करने के लिए चंद्रयान 3 का सीधा प्रसारण उन्हें दिखाने का निर्णय लिया गया था। मनपा शिक्षा उपायुक्त नंदा गायकवाड़ की निगरानी में शुक्रवार को मनपा स्कूलों के करीब 100 बच्चे स्मार्ट सिटी कार्यालय पहुंचे और सीधा प्रसारण देखकर आश्चर्यचकित रह गए। वे इस पल को आंखों में समाकर खुशी से झूम उठे। इस अवसर पर विज्ञान केंद्र के विशेषज्ञों द्वारा चंद्रयान मुहिम पर मार्गदर्शन भी किया गया। इस अवसर पर स्मार्ट स्कूल प्रकल्प के गणेश दांडगे, सर्व शिक्षा अभियान के ज्ञानदेव सांगले, स्मार्ट सिटी के फैज अली, किरण आढे आदि भी उपस्थित थे।



### ...और 750 विद्यार्थी बोल उठे भारत माता की जय

**छत्रपति संभाजीनगर |** शुक्रवार को दोपहर 2 बजकर, 35 मिनट पर ज्यों ही चंद्रयान-3 ने उड़ान भरी, प्रक्षेपण का सीधा प्रसारण देखने के लिए एमजीएम में जमा हुए शहर के लगभग 750 विद्यार्थियों ने अवाक ही 'भारत माता की जय' का घोष किया। इस रोमांचकारी प्रक्षेपण का अन्य लोगों ने भी आनंद उठाया। एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोलीय विज्ञान केंद्र की ओर से विश्वविद्यालय के रुक्मिणी सभागार में लाइव टेलीकास्ट देखने की व्यवस्था की गई थी। इस दृश्य को देखने शहर के 50 स्कूलों के 750 विद्यार्थी तथा अन्य लगभग 100 लोग सभागार में जमा हुए। कुलपति डॉ. विलास सपकाल ने इस प्रक्षेपण महोत्सव पर मार्गदर्शन करते हुए विद्यार्थियों का विज्ञान क्षेत्र में शोध के माध्यम से आगे बढ़ने तथा देश की तरक्की में साथ देने का आह्वान किया। एमजीएम विज्ञान केंद्र के संचालक श्रीनिवास औंधकर ने चंद्रयान-3 के लिए इस्तेमाल किए गए एलवीएम-एम 4 बाहुबली रॉकेट की जानकारी दी। इस समय एमजीएम के सचिव अंकुशराव कदम, डॉ. विजय देशमुख, एबी पाटील आदि भी मौजूद थे। अशोक क्षीरसागर ने संचालन किया।



संभाजीनगर, शनिवार, १५ जुलै २०२३ सकाळ TODAY SakalNews #SakalMediaNews www.esakal.com ४





## बन्सल क्लासेसच्या शाखांसह एमजीएम, स्मार्ट सिटीतर्फे उपक्रम

# विद्यार्थ्यांनी अनुभवला 'चांद्रयान' चा थरार

छत्रपती संभाजीनगर, ता. १४ (बातमीदार) भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतर्फे (इस्रो) शुक्रवारी 'चांद्रयान-३' चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले आहे. याचे प्रक्षेपण बन्सल क्लासेसच्या सर्व शाखांमध्ये विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. शाळेतील सर्व डिजिटल बोर्डसवर या मोहिमेचे महत्त्व, माहिती, मेहनत याबाबत देखील शिक्षकांनी मार्गदर्शन केले. 'चांद्रयान-३'ने चंद्राच्या कक्षेत प्रवेश करताच विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला.

[illegible]

'हम होंगे कामयाब'चा जयघोष

[illegible]

“ *Smart School To Best School* ”

# समर कॅम्प...

- महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा संपलानंतर व शाळा सुरु होण्यापूर्वी “समर कॅम्प ” चे आयोजन केले होते.




**नवराष्ट्र**

**पहिल्यांदाच उपक्रम** • **शहरातील ११ शाळांमध्ये १५ ते ३० एप्रिल या कालावधीत उपक्रम**

## मनपा शाळेत 'समर कॅम्प'चे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, (वा.) मनपाच्या केंद्रीय ११शाळांमध्ये १५ ते ३० एप्रिल या कालावधीत समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांसाठी संगीत, गायन, वादन, चित्रकला, क्रीडा, कार्यानुभव, शाळा पूर्वतयारी मेळावा, पारंपरिक खेळ, भाषा/ गणित सह मला बी इंग्लिश शिकायचे आहे, असे विविध उपक्रम घेतले जाणार आहेत. असा उपक्रम पहिल्यांदाच मनपा शाळेत होत आहे. यावर्षी पालिकेच्या शाळा व विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी मनपा आयुक्त जी श्रीकांत यांनी मनपा अंदाजपत्रकात मोठी तरतुद केली आहे. तसेच पालिकेच्या शाळेत स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल हा प्रकल्प राबवला जात असून या अंतर्गत स्मार्ट गुरु अॅप निर्मिती अनुपस्थित विद्यार्थ्यांसाठी, सावित्री एज्युकेशन कंट्रोल रुमची स्थापना, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिव्यांग मित्र, सेमी इंग्रजी



### स्केटिंग, समूह गीतगायन, समूह नृत्याचा समावेश

याप्रसंगी मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना समर कॅम्प बाबत माहिती सांगितली. या समर कॅम्पमध्ये स्केटिंग, समूहगीतगायन, समूहनृत्य, शुद्धलेखन, स्पेलिंग पाठांतर, संस्कारक्षम गोष्टीचे वाचन, पथनाट्याचे आयोजन,तसेच विविध देशी खेळ व क्रिकेट घेतले जाणार आहेत. तसेच सर्व विद्यार्थ्यांना एक दिवस वॉटर पार्कला नेण्यात येणार आहे. या समर कॅम्पमध्ये इयत्ता पहिली ते आठवीचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले आहेत. समर कॅम्प च्या आयोजनामध्ये तेजस्विनी देसले, मनीषा नगरकर, स्मिता मुळे, मोनिका चव्हाण, बी. आर. राठोड व रश्मी होनमुटे यांचा सहभाग आहे.

### अधिकाऱ्यांचीही मुले शाळेत

पालकांचा मनपा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोनबदललेला आहे मध्यम मध्यमवर्गीयांसह नायब तहसीलदार यांचे पाल्य मनपा शाळेत शिक्षण घेत आहेत. यावर्षी उन्हाळी सुट्यांमध्ये मनपा शाळांचे वर्षभराचे शैक्षणिक कॅलेंडर तयार करण्यात येत आहे. याअंतर्गत मनपाच्या केंद्रीय शाळेत समर कॅम्पचे आयोजन केले असून, विद्यार्थ्यांना विविध सुविधा देण्यासाठी मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी पालिकेच्या बजेटमध्ये मोठी तरतूद केली आहे.

शहरातील मनपाच्या शाळांकडे लोकांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी मनपाकडून विविध प्रकारचे नियोजन केले जात आहे. तसेच शाळांचा दर्जा वाढ करून खासगी शाळांप्रमाणे उपक्रम मनपा शाळेतून सुरु करण्यात येत आहेत. आगामी काळात सीबीएससी शाळांची संख्या वाढवून त्यांना अधिक चांगले योग्य करण्याचे काम सुरु आहे. -जी. श्रीकांत, मनपा प्रशासक.

TODAY छत्रपती संभाजीनगर, मंगळवार, १६ एप्रिल २०२४ सकाळ

## ‘मलाबी इंग्लिश शिकायचं’

### गोरगरिबांच्या मुलांसाठी महापालिका शाळांमध्ये उपक्रम



**प्रियदर्शनी विद्यालयाची वॉटर पार्क सहल**

## प्रशासक रमले टायर गाडाच्या खेळात!

### महापालिका शाळेत ‘मस्तीची पाठशाळा’ कार्यक्रम



छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांसोबत टायर गाडा खेळताना जी. श्रीकांत.

## उन्हाळी शिबिरात थ्रीडी, तारांगण शो

### मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला आकाशगंगेचा अनुभव

**ग्रहांचा अभ्यास**

# स्मार्ट किऑक्स संच(SMART KIOSK)...

- महानगरपालिकेच्या 50 शाळा स्मार्ट सिटी अंतर्गत स्मार्ट झाल्या आहेत. उर्वरित भाड्याच्या इमारतीमध्ये असलेल्या 6 शाळा व 50 बालवर्गासाठी स्मार्ट सिटी अंतर्गत “संगणक स्मार्ट किऑक्स संच (SMART KIOSK) ” पुरवठा करण्याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक महोद्य यांनी नुकताच निर्णय घेतला आहे. त्यामुळे बालवाडीतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा स्मार्ट शिक्षण मिळेल.



# आदर्श / पीएमश्री स्कुल...

- केंद्र शासन कडून महानगरपालिकेची सिल्कमिल कॉलनी शाळेची “पीएमश्री स्कुल” म्हणून निवड झाली.
- राज्य शासन कडून महानगरपालिकेच्या नारेगांव आणि बनेवाडी या शाळेची “डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा” म्हणून निवड झाली.






## मनपाच्या सिल्क मिल्क कॉलनी शाळेची पीएमश्री स्कूल म्हणून निवड



## मनपाच्या दोन शाळांना ५ कोटी ५५ लाखांचा निधी

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळेसाठी निवड

लोकमत विशेष

मुजीब देवणीकर
लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत राज्यातील ४८८ शाळांचा कायापालट करण्याचा निर्णय घेतला. छत्रपती संभाजीनगर शहरातील महापालिकेच्या नारेगाव आणि बनेवाडी येथील शाळांची निवड करण्यात आली. दोन्ही शाळांना तब्बल ५ कोटी ५५ लाख ९७ हजार रुपयांचा निधी देण्याचा निर्णय झाला. एवढ्या मोठ्या निधीत शाळेचा कशा पद्धतीने कायापालट करायचा, यादृष्टीने महापालिका प्रशासन कामाला लागले आहे.

मागील चार दशकांमध्ये मनपा प्रशासनाने शिक्षण, आरोग्य विभागावर फारसा खर्च केलाच नाही. त्यामुळे या दोन्ही विभागांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. स्मार्ट सिटी अंतर्गत मनपाच्या ५० शाळा स्मार्ट करण्यात आल्या. यासाठी तब्बल ६३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. आरोग्य विभागावर १० कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. महापालिकेच्या ५६ शाळांमध्ये १८ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नारेगाव, किराडपुरा, मिटमिटा येथील शाळांमध्ये दरवर्षी प्रवेशासाठी पालकांच्या अक्षरशः रांगा लागतात. त्यामुळे प्रशासक जी. श्रीकांत यांनी नारेगाव येथील शाळा दत्तक घेतली. दर्जेदार सुविधा, संरक्षण भिंत मनपा निधीतून उभारण्याचे नियोजन करण्यात येत होते. त्यातच मागील आठवड्यात राज्य शासनाने महापालिकेच्या दोन शाळांची निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत केली. नारेगाव शाळेसाठी ३ कोटी २० लाख २९ हजार रुपयांचा तर बनेवाडी शाळेसाठी २ कोटी ३५ लाख ६८ हजार रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली. याशिवाय जिल्ह्यातील १२ शाळांची निवड राज्य शासनाने आदर्श शाळांसाठी केली.

#### मनपाच्या इतिहासात प्रथमच

महापालिकेच्या इतिहासात प्रथमच एखाद्या शाळेसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात राज्य शासनाकडून निधी मिळाला. यापूर्वी मनपाने अनेकदा राज्य शासनाकडे शाळा दुरुस्तीसाठी निधी द्यावा, अशी मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली. मात्र, एक रुपयाही निधी देण्यात आला नाही.

#### नियोजन करणे सुरु

शासन अध्यादेशात मनपाच्या दोन शाळांना ५ कोटी ५५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. त्यादृष्टीने प्रशासनाकडून नियोजन करण्यात येत आहे. प्रशासक जी. श्रीकांत यांच्या सूचनेनुसार अंदाजपत्रक तयार केले जाईल. शासन निधीचा पहिला टप्पा प्राप्त होताच निविदा प्रसिद्ध केली जाईल. शासनाकडे योग्य प्रस्ताव, पाठपुरावा केल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला.

-ए.बी. देशमुख,
शहर अभियंता मनपा

# शिक्षण विभागासाठी तरतूद...

- महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची **गुणवत्ता** वाढविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या **सोय-सुविधा** उपलब्ध करुन देण्यासाठी मनपाच्या अर्थसंकल्पामध्ये (2025-26) प्रथमत: रक्कम **रु.11.77** कोटी ची तरतूद करण्यात आली.





*“ Smart School To Best School ”*

# ज्ञानमंदिर...

➤ **महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढल्यामुळे वर्ग खोल्या कमी पडल्या त्यामुळे मा.आयुक्त महोद्य यांनी अडगळीत पड्लेल्या शादीखान्या मध्ये वर्ग सुरु केले व मिटमिटा येथे समारी पार्क्च्या शेजारी 1.5 एकर मध्ये SMART / BEST SCHOOL बांधण्याचे नियोजन केले.**







किराडपुऱ्यातील दारू, नशेखोरांचा अड्डा झाला मुक्त

## शादीखाना हॉलमध्ये सुरू केले ज्ञानमंदिर!

छत्रपती संभाजीनगर, दि. ४ (प्रतिनिधी)- किराडपुरा नंबर एक शाळेच्या क्रीडांगणासमोर असलेल्या मनपाच्या धूळखात पडलेल्या शादीखाना हॉलमध्ये दारू अड्डा, नशा करणाऱ्यांचा अड्डा झाला होता. मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांनी हा दारूअड्डा मुक्त करीत शादीखाना हॉलमध्ये शाळेचे वर्ग सुरू केले.

मनपा अंतर्गत सुरू असलेल्या शाळांमध्ये प्रशासक जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल हा प्रकल्प राबविला जात आहे. मनपाच्या किराडपुरा नंबर एक शाळेच्या क्रीडांगणासमोर मनपाचा शादीखाना हॉल होता. हा हॉल धूळखात पडल्याने त्या हॉलमध्ये दारूचा आणि नशाखोरांचा अड्डा बनला होता. काही दिवसापूर्वी प्रशासकांनी शादीखाना हॉलची पाहणी केली असता शादीखाना हॉल दारू व नशाखोरांचा अड्डा झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. किराडपुरा मनपा शाळेत विद्यार्थी संख्या वाढली असून, बालवाडी ते दहावीपर्यंत ८५६ विद्यार्थी संख्या झाली आहे. या वर्षी इयत्ता पहिली आणि आठवी व नववी वर्गाची प्रत्येकी एक तुकडी वाढली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका रईसा खान बेगम यांनी तुकड्या वाढल्यामुळे शाळेतील वर्गखोल्या कमी पडत असल्यामुळे शाळाखोली बांधून देण्याची त्यांनी प्रशासकांना विनंती केली होती. प्रशासकांनी याची दखल घेत दारू व नशाखोरांचा अड्डा झालेला शादीखाना हॉल मुक्त करून त्याठिकाणी वर्ग भरण्यास परवानगी दिली.

किराडपुरा येथील शादीखाना हॉलमध्ये आता असे वर्ग भरत असून, त्याला प्रसाद मिळत आहे.



## नशेखोरीच्या अड्ड्यावर साकारले ज्ञानमंदिर

### शेकडो विद्यार्थी गिरवताहेत शिक्षणाचे धडे

छत्रपती संभाजीनगर, पुढारी वृत्तसेवा : शहरातील विविध भागांत पडक्या आणि जुन्या इमारतींमध्ये नशेखोरांचे अड्डे तयार झाले आहेत. यापैकीच किराडपुरा येथील शादीखान्याच्या इमारतीत मनपा प्रशासकांच्या पाहणीत दारूच्या बाटल्या, नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या बटनच्या गोळ्यांचे रिकामे स्ट्रीप्स आढळून आले होते. आता या जागेचा वापर ज्ञानमंदिरासाठी केला जात आहे. या ठिकाणी शेकडो विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवत आहेत.

किराडपुरा भागात पालिकेची शाळा आहे. या शाळेलगतच पालिकेचाच शादीखाना आहे. परंतु काही महिन्यांपासून या शादीखान्याचा वापर नसल्याने नशेखोरांचा अड्डा बनला होता. त्याचा त्रास परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत. काही महिन्यांपूर्वी प्रशासक जी. श्रीकांत या भागात पाहणीसाठी गेले असता, परिसरातील नागरिकांनी शादीखान्याची दुरवस्था दाखविली. याठिकाणी दारूच्या बाटल्यांचा पडलेला खच प्रशासकांनी पाहिला. दरम्यान, नुकत्याच शाळा सुरू झाल्या असून, किराडपुरा नंबर एक शाळेत विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी गर्दी वाढली आहे. गतवर्षी ६६७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. यंदा त्यात २०० प्रवेश वाढले आहेत. आता बालवाडी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची संख्या ८५६ झाली आहे. पहिली व आठवी, नवव्या वर्गाची एक-एक तुकडी वाढली आहे. त्यामुळे सध्या असलेल्या शाळेच्या इमारतीमधील खोल्या कमी पडत आहेत. म्हणून मुख्याध्यापिका रईसा खान यांनी शादीखान्याच्या जागेचा वापर करण्यासाठी विनंती प्रशासकाकडे केली. त्याला प्रशासकांनी मंजुरी दिली. जागेची साफसफाई करून त्याठिकाणी शाळा सुरु करण्यात आली आहे. पालिकेच्या या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान आणि आनंद व्यक्त केला आहे.

नशेखोरांचा अड्डा असलेल्या किराडपुऱ्यातील शादीखाना या जागेवर आता मनपा शाळेतील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



*“ Smart School To Best School ”*

# विद्यार्थ्यांना प्रोत्साहन...

➢ महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना “प्रोत्साहन” देण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक महोद्य स्वत: त्यांचा सत्कार करतात.









## विद्यार्थ्यांचा घरी बोलावून सत्कार

म. टा. प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर

नॅशनल मेन्स कम मिरीट स्कॉलरशिप (एनएमएमएस) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या २३ विद्यार्थ्यांना महापालिकेने प्रशासक जी. श्रीकांत यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी बोलावून त्यांचा सत्कार केला व शुभेच्छा दिल्या.

जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल हा उपक्रम महापालिकेच्या शाळांसाठी राबवला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांना बसवले जात आहे. पालिका शाळेतील इयत्ता आठवीचे ३१० विद्यार्थी नॅशनल मेन्स कम मिरीट स्कॉलरशिप परीक्षेला बसले होते, त्यापैकी २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जी. श्रीकांत यांनी आपल्या 'जलश्री' या शासकीय निवासस्थानी बोलावून घेतले, त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. भविष्यातील परीक्षांमध्ये यापेक्षाही उज्वल यश मिळवा असे ते या विद्यार्थ्यांना म्हणाले.

या वेळी उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख नंदा गायकवाड, नियंत्रण अधिकारी गणेश दांडगे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, केंद्रीय मुख्याध्यापक संगीता ताजने, रहिसा बेगम, शेख अहेदम पटेल, तुषार ताठे, मधुकर टोणपे आदी उपस्थित होते.



गुणंवत विद्यार्थ्यांसोबत जी.श्रीकांत व शिक्षकवर्ग .



## युरोपमध्ये देशाचे प्रतिनिधित्व केलेल्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचा सत्कार

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी)-युरोपमधील टॅलिन, इस्टोनिया देशात झालेल्या रोबोटेक्स इंटरनॅशनल स्पर्धेमध्ये छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या चार विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन देशाचे प्रतिनिधित्व केले. या विद्यार्थ्यांचा

**फ्रेंच, जर्मन भाषा शिकविणार**

महापालिकेच्या शाळांमध्ये रोबोटिक्स सोबतच जागतिक स्तरावर प्रचंड मागणी असलेल्या फ्रेंच व जर्मन भाषा पुढील शैक्षणिक सत्रापासून शिकविण्याचा मानस आहे.

जी. श्रीकांत (आयुक्त तथा प्रशासक मनपा)

“ *Smart School To Best School* ”

# इ.१०वी निकाल...

- शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये इयत्ता 10वी 87.73% निकाल व दोन शाळांचा 100% निकाल लागला आहे.
- मा. आयुक्त तथा प्रशासक महोद्य यांनी एकूण 51 गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला.





## पालिकेच्या विद्यार्थ्यांची भरारी

**दोन शाळेचा निकाल शंभर टक्के**

**म. टा. प्रतिनिधी,** छत्रपती संभाजीनगर

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत महापालिका माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा यंदा कायम ठेवली आहे. मनपा शाळांमधून ७९२ विद्यार्थ्यांनी दहावीची



मिळवून यशाची परंपरा कायम ठेवली. महापालिकेतील माध्यमिक शाळांमधील दहावी परीक्षेसाठी ८०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. पैकी ७९२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात ७०९ विद्यार्थी उत्तीर्ण

शाळेचा ९६.३० टक्के, नारेगाव उर्दू शाळेचा ९५ टक्के निकाल लागला आहे. मिटमिटा येथील शाळेतील अक्षरा दत्तू सोनवणे हिने मराठी माध्यमातून ८८.७० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला आहे.या बरोबरच शहाबाझार येथील शाळेतील सिद्दीकी यासीरा हिने उर्दू माध्यमातून ८४.६० टक्के गुण घेऊन उर्दू माध्यमात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यासोबतच सिडको एन-७ येथील रोजी डिसूजा ८७ टक्के गुण, मिटमिटा येथील शाळेतील पायल निलेश निंबारे ८४.४० टक्के, नारेगाव

**नवभारत**

## अब मनपा स्कूल बनेंगे सबसे बेस्ट स्कूल

**आयुक्त जी. श्रीकांत ने सुविधाएं देने को लेकर किया आश्वस्त**

**17** स्कूलों में 75 प्रश से अधिक अंक | **51** मेधावी छात्रों का किया गया सम्मान



**इन छात्रों को रहा समावेश**



## गुणवंतांचे प्रशासकांनी केले कौतुक

“ *Smart School To Best School* ”


# पटसंख्या वाढ...

| वर्ग | 2023-24 | 2024-25 |
|---|---|---|
| बालवाडी | 3249 | 3699 |
| 1ली | 1729 | 2001 |
| 2री | 1495 | 1794 |
| 3री | 1569 | 1656 |
| 4थी | 1368 | 1662 |
| 5वी | 1336 | 1401 |
| 6वी | 1190 | 1324 |
| 7वी | 1093 | 1206 |
| 8वी | 1146 | 1188 |
| 9वी | 906 | 950 |
| 10वी | 835 | 849 |
| एकूण | **15916** | **17730** |

“ *Smart School To Best School* ”

# उपस्थिती वाढ ....

## उपस्थिती वाढ



“ *Smart School To Best School* ”

# गुणवत्ता वाढ..

| वर्ग | पट संख्या | परीक्षा दिलिले एकूण विद्यार्थी | मराठी | | | इंग्रजी | | | गणित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 60 % पेक्षा कमी | 61 ते 80% | 81% पुढे | 60 % पेक्षा कमी | 61 ते 80% | 81 % पुढे | 60 % पेक्षा कमी | 61 ते 80% | 81 % पुढे |
| 3 | 1656 | 1331 | 356 | 683 | 261 | 260 | 706 | 274 | 281 | 676 | 226 |
| 4 | 1662 | 1556 | 287 | 783 | 451 | 225 | 791 | 485 | 244 | 820 | 393 |
| 5 | 1401 | 1308 | 350 | 660 | 248 | 254 | 689 | 261 | 276 | 677 | 213 |
| | 4719 | 4195 | 993 | 2126 | 960 | 739 | 2186 | 1020 | 801 | 2173 | 832 |
| टक्केवारी (%) | | | 23.67% | 50.68% | 22.88% | 17.62% | 52.11% | 24.31% | 19.09% | 51.80% | 20.00% |
| 6 | 1324 | 1264 | 199 | 613 | 221 | 141 | 724 | 273 | 227 | 569 | 194 |
| 7 | 1206 | 1178 | 167 | 457 | 313 | 207 | 620 | 318 | 188 | 532 | 266 |
| 8 | 1188 | 1168 | 289 | 420 | 238 | 311 | 448 | 310 | 218 | 377 | 397 |
| | 3718 | 3610 | 655 | 1490 | 772 | 659 | 1792 | 901 | 633 | 1478 | 857 |
| टक्केवारी (%) | | | 18.14% | 41.27% | 21.39% | 18.25% | 49.64% | 24.96% | 17.53% | 40.94% | 24.00% |